ePaper
पूर आणि महागाईमुळे पाकिस्तान वठणीवर, भारताशी व्यापाराबाबत मोठी घोषणा!

|| वर्ष - 6 । अंक - 143 || UDYAM-MH-26-0158827 ||

महाईन्यूज (TM)
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



आतील पानांत


- "मूल समजून घेताना" चर्चा, संवाद यातून सुवर्णमध्य काढा
- मेट्रोच्या खांबांवर चमकोगिरी नको !
- पवारांचा मोदी सरकारवर हल्लाबोल !


www.mahaenews.com | मंगळवार। दिनांक 30 ऑगस्ट2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## पाच वर्षांनी तारांगण प्रकल्पाचे काम पूर्ण

# तारांगण प्रकल्प 'कुलूप' बंद!

## पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाला मुहूर्त मिळेना

पिंपरी।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

शहरातील विद्यार्थी, नागरिकांना खगोलशास्त्राची इत्थंभूत माहिती मिळावी, या उद्देशाने पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या विद्युत विभागातर्फे चिंचवड येथील सायन्स पार्कच्या बाजूलाच तारांगण प्रकल्प उभारला आहे.तब्बल पाच वर्षांनी तारांगण प्रकल्पाचे काम पूर्ण झाले. मात्र उद्घाटनाअभावी गेल्या तीन महिन्यांपासून हा महत्वाकांक्षी प्रकल्प कुलूपबंद आहे.

या प्रकल्पाचे काम मार्च 2018 रोजी सुरू करण्यात आले होते. जपान, टोकिओ येथील ठेकेदाराने या प्रकल्पाचे काम केले आहे. या कामासाठी 10 महिन्यांची मुदत देण्यात आली होती. मात्र, काम सुरू करण्यास विलंब झाला. त्यानंतर आलेल्या करोना महामारीमुळे आणखीनच विलंब होत गेला. तारांगण प्रकल्पाच्या या कामासाठी तीनवेळा मुदतवाढ देण्यात आली. तब्बल पाच वर्षांनी हे काम आता पूर्ण झाले असून 11 कोटी 12 लाख 43 हजार रूपयांचा तारांगण प्रकल्पासाठी खर्च करण्यात आला आहे. तारांगण प्रकल्पाविषयी माहिती देताना महापालिकेचे कनिष्ठ अभियंता श्यामसुंदर बनसोडे म्हणाले, तारांगण प्रकल्पात 15 मीटर व्यासाचा एक अर्धगोलाकृती डोम (ऑप्टो-मेकॅनिकल आणि 2 डी डिजिटल) उभारण्यात आला आहे. या डोमच्या माध्यमातून आकाशगंगा, पृथ्वीवरील वातावरण, वातावरणातील बदल, आकाशातील ग्रह, तारे, नक्षत्र, सुर्य, पृथ्वी आदीविषयी प्रत्यक्ष पाहता येणार असून आकाश दर्शन करत असल्याचा नागरिकांना अनुभव येणार आहे. एकाचवेळी 120 नागरिक हे डोम पाहू शकतात. याठिकाणी दोन मजली इमारत उभारण्यात आली आहे. खगोलशास्त्राचा अभ्यास करण्यासाठी येणाऱ्या नागरिकांना बसण्यासाठी एक 180 आसन क्षमतेचे सभागृह उभारण्यात आले आहे.



### उद्घाटन रखडले...

या प्रकल्पाचे काम पूर्ण झाल्याने तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते जून महिन्यामध्ये याचे उद्घाटन होणार होते. मात्र, काही कारणास्तव पवार यांचा शहर दौरा रद्द झाला आणि या प्रकल्पाचे उद्घाटन रेंगाळले. त्यानंतर 30 जून रोजी महाविकास आघाडी सरकार कोसळून शिंदे-फडणवीस सरकार आले.

या नवीन सरकारला दोन महिने होत आले. पण, जिल्ह्याला पालकमंत्री मिळाला नाही.

त्यामुळे प्रकल्पाचे उद्घघाटन कोणाच्या हस्ते करायचे असा प्रश्न आहे. त्यातच आयुक्तांची बदली झाली. नवीन आयुक्त आले. त्यामुळे उद्घाटन आणखी काही दिवस रखडण्याची शक्यता आहे.

# नागरी सुरक्षिततेची काळजी घ्या !

## महापालिकेचे आवाहन : सार्वजनिक गणेश मंडळांना सूचना

पिंपरी-चिंचवड।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।



गणेशोत्सव साजरा करताना कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी शहरातील गणेश मंडळांनी तसेच नागरिकांनी सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून महापालिकेच्या पथदिव्यांच्या खांबाचा आधार न घेता तसेच पथदिव्यांचा पोल व मांडव यामध्ये सुरक्षित अंतर ठेवून श्रीगणेशोत्सव मंडळाची उभारणी करावी. विद्युत सुरक्षिततेबाबत महापालिकेने दिलेल्या सूचना कटाक्षाने पाळून सर्व गणेश मंडळांनी आणि नागरिकांनी पिंपरी-चिंचवड महापालिकेस सहकार्य करून अधिकृत वीज जोडणी घेऊन हा गणेशोत्सव आनंदात साजरा करावा, असे आवाहन विद्युत विभागाचे सह शहर अभियंता संजय खाबडे यांनी केले आहे. नागरिकांच्या सार्वजनिक सुरक्षिततेकरीता महापालिकेमार्फत पिंपरी चिंचवड महापालिका कार्यक्षेत्रातील इमारती, सार्वजनिक ठिकाणे, रस्त्यावरील प्रकाश व्यवस्थेकरीता दिवाबत्तीची व्यवस्था करण्यात आलेली आहे. दिवाबत्ती प्रकाश व्यवस्थेच्या देखभाल दुरुस्तीचे काम महानगरपालिकेमार्फत आवश्यकतेनुसार करण्यात येते. महानगरपालिकेच्या सर्व विद्युत अभियंत्यांमार्फत शहरवासियांच्या सुरक्षिततेसाठी पिंपरी चिंचवड शहरातील पथ दिव्यांच्या सर्व खांबांची तपासणी करण्यात आली आहे. धोकादायक परिस्थितीमध्ये एकही पोल आढळुन येणार नाही याची दक्षता घेण्यात येत आहे. तथापि, विजेच्या खांबाला शॉक लागणे, गंजलेला व धोकादायक खांब, तुटलेला जंक्शन बॉक्स, फिडर पिलर आढळल्यास नागरिकांनी महापालिकेच्या दुरध्वनी क्रमांकावर

किंवा महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर तक्रार नोंदवावी.

### ... तर महापालिका दुर्घटनेस जबाबदार नाही

दरम्यान, महापालिकेकडून इमारती व दिवाबत्तीच्या खांबांमधून प्रकाश व्यवस्थेकरीता थ्री फेज ४४० व्होल्टचा वीजपुरवठा केला जातो. तरी नागरिकांनी सुरक्षिततेबाबत महापालिकेने दिलेल्या सूचनांचे कटाक्षाने पालन करावे. नागरिकांनी पथदिवे खांब व विद्युत यंत्रणेशी कोणत्याही प्रकारची छेडछाड करु नये, खांबाला आणि फिडर पिलरला स्पर्श करु नये, पथदिवे खांबातुन विनापरवाना वीज घेऊ नये, जनावरे खांबांना बांधु नयेत, जंक्शन बॉक्सवर पाय ठेवून खांबावर चढु नये, कपडे वाळत घालण्यासाठी खांबांना तारा बांधू नये, बांधकामामध्ये पथदिव्यांचे खांब घेऊ नये, खांबांना फ्लेक्स, होर्डिंग्ज बांधू नये, कोणत्याही प्रकारची केबल अथवा तार खांबावरुन ओढू नये. अशा विविध प्रकारच्या कृत्यामुळे जीवितास धोका उत्पन्न होण्याची किंवा जीवितहानी होण्याची शक्यता असल्याने याबाबत सर्वांनी दक्षता घ्यावी. अशा प्रकारच्या कृत्यामुळे कोणत्याही प्रकारची जीवित अथवा वित्त हानी झाल्यास महानगरपालिका अशा घटनेस जबाबदार राहणार नाही, अशी माहिती महापालिकेच्या विद्युत विभागाच्या वतीने देण्यात आली आहे.

# "मूल समजून घेताना" चर्चा, संवाद यातून सुवर्णमध्य काढा!

## डॉ. नीलिमा गायकवाड : -"केटीईएस" मध्ये पालकांसाठी समुपदेशनपर व्याख्यान

**राजगुरुनगर । ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**



कोरोना महामारीनंतर शाळा, शिक्षण पद्धती यांच्या व्याख्या सर्वार्थाने बदलल्या. यामध्ये सर्वात मोठा बदल विद्यार्थ्यांना स्वीकारावा लागला. यातून पालकत्व, संगोपन यांच्या प्रत्येक वळणावर अडचणी उभ्या राहत आहेत. मात्र या अडचणींना दूर करण्यासाठी आणि "आपले मूल समजून घेण्यासाठी" विद्यार्थी आणि पालक यांनी सुवर्णमध्य काढायला हवा. चर्चा संवाद यातून हे प्रश्न सुटू शकतात असे असा सल्ला व्याख्यात्या व समुपदेशक डॉ. नीलिमा गायकवाड यांनी दिला.

पालकांच्या विविध अडचणी, प्रश्न, समस्येवर मार्गदर्शन करुन मुलांना कसे समजून घेतल्या जावू शकते यावर राजगुरुनगर येथील के.टी.ई.एस. इंग्रजी माध्यम विद्यालय, प्राथमिक विभागाच्या पालक शिक्षक संघ कार्यकारिणीच्या वतीने "मूल समजून घेताना" या विषयावर पालकांसाठी समुपदेशनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी डॉ. गायकवाड बोलत होत्या. कार्यक्रमासाठी अध्यक्षस्थानी पालक शिक्षक कार्यकारिणीच्या अध्यक्षा व शाळेच्या मुख्याध्यापिका अनिता गुजराथी या होत्या. व्यासपीठावर कार्यकारिणीच्या उपाध्यक्ष अश्विनी भोगाडे, वैशाली कुडेकर, तसेच अनुराधा गायकवाड, ज्योती ठाकूर, कुसुम जाधव, ज्योती राठोड,सुनीता पवार यावेळी उपस्थित होत्या.

डॉ. गायकवाड पुढे म्हणाल्या तब्बल दोन वर्ष कोरोना महामारीच्या काळामध्ये मुले घरात होती. या कालावधीत मुले पालक,कुटुंबांच्या अधिकाधिक जवळ आली. यातून ते संरक्षित असे वातावरण शोधू लागले. नेमक्या माणसांचीच त्यांना सवय लागली. त्यामुळे शाळा सुरू झाल्यानंतर शाळेमध्ये त्यांना एकटेपणाची जाणीव निर्माण झाली. कोणामध्ये मिसळायचे नाही. त्यांना एक प्रकारे या वातावरणाची भीती वाटत होती. यातूनच शाळेत जायचा, अभ्यास करण्याचा कंटाळा निर्माण होत असल्याच्या अनेक तक्रारी सध्या पालकांकडून येत आहेत हा कंटाळा ही भीती पुढे जाऊन अधिकाधिक गुंतागुंत निर्माण करेल आणि यातून मुलांचे प्रश्न अधिकच तीव्र होत जातील अशी एक भीती आहे. त्यामुळे मुलांना समजून घेण्याचा, जबाबदारीचा हा काळ आहे. मुलांच्या गेल्या दोन वर्षातील बदलेल्या लाईफस्टाईल मुलांमध्ये 'अँटी सोशल' होण्याचा आजार एक प्रकारे बळावत आहे. यातून ती चिडचिडी, रागीट होत आहेत. अनेक पालक या समस्या घेऊन येत असल्याचे सध्याचे चित्र आहे.

मुलांना समजून घेताना पालकांनी संवादाचे माध्यम वापरायला हवे असे सांगून डॉ. गायकवाड पुढे म्हणाल्या, सध्याच्या शिक्षण पद्धतीमध्ये विविध तांत्रिक गोष्टींचा समावेश झालेला आहे. त्याला त्वरित नाकरता येणे अशक्य आहे .त्यामुळे आपणच आपल्या जीवन पद्धतीमध्ये थोड्या प्रमाणात बदल घडवणे आवश्यक झाले आहे. आरडाओरडा,चिडचिड न करता समंजसपणाने मुलांशी संवाद चालायला हवा. त्यांच्याशी चर्चा करायला हवी. मुख्यत्वे मुलांशी घरामध्ये बोलायला हवे. यातूनच सध्याच्या परिस्थितीमुळे मुलांमध्ये निर्माण झालेल्या अडचणी, त्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी मदत होईल.

कार्यक्रमाचे आभार अजित जरे यांनी मानले.

### पालकांनो, हे करा...

- दररोज मुलांची बॅग चेक करा
- मुलांना विश्वासात घ्या
- प्रश्नांचा भडिमार, आरडाओरडा, मार यापेक्षा प्रेमाने संवाद साधा.
- अपेक्षांचे ओझे लादू नका.
- मुलांच्या चुकीच्या गोष्टीचे समर्थन करू नका.
- मुलांसाठी केलेले नियम घरातील सरसकट सर्वांनी पाळा

**“ मुलांच्या शिक्षणामध्ये शाळेच्या भूमि केच्या बरोबरीने पालकांची भूमिका देखील महत्त्वाची आहे. सध्या पालक, शिक्षक, शाळा आणि महत्त्वाचे म्हणजे विद्यार्थी वेगळ्या परिस्थितीतून मार्गक्रमण करत आहे. यामध्ये आपण सर्वांनी एकत्र येत त्यांना पुढे जाण्यासाठी मदत करणे आवश्यक आहे.**

**- अनिता गुजराथी, मुख्याध्यापिका .**

**“ कोरोनामुळे लागू झालेल्या लॉकडाऊननंतर डिजिटल गॅजेट्सच्या वापराचे प्रमाण वाढल्याने मुले हातात असलेल्या मोबाईलवर शिकतायेत की निरुद्देश वेळ घालवतायेत, याचा अंदाज लावणे सर्वांनाच कठीण होऊन बसले आहे. "पूर्वी मुलांकडून मोबाईल सहज काढून घेता यायचा. आता तसे रोखता येत नाही, कारण केवळ शाळा-क्लासेसच शिक्षणच नव्हे, तर गृहपाठही मोबाईलवरच पाठवला जातो. परिणामी अभ्यास असला काय, नसला काय, मुलांना कारणे मिळाली. त्यामुळे तो खरोखर वाचतायोत की दुसरं काय करतायोत, याबाबत गोंधळ होतो. मात्र यातून आता सुवर्णमध्य काढावा लागणार आहे.**

**- डॉ.नीलिमा गायकवाड, समुपदेशक.**

# पुणे : सत्ताधाऱ्यांना पवारांची संगत नकोशी?; मेळाव्याकडे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, कृषिमंत्र्यांनी फिरवली पाठ

**चाकण । ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**



बागायतदार संघाच्या रविवारी वाकड (पिंपरी-चिंचवड) येथे झालेल्या वार्षिक मेळाव्याकडे राज्यातील सत्ताधाऱ्यांनी पाठ फिरवली. संघाच्या निमंत्रण पत्रिकेत मेळाव्याचे उद्‌घाटक म्हणून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, प्रमुख पाहुणे म्हणून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि कृषिमंत्री अब्दुल सत्तार यांची नावे होती. पण, या तिघांनीही मेळाव्याकडे पाठ फिरवली. यांच्या अनुपस्थितीबद्दल शेतकऱ्यांमध्ये कुजबुज सुरू होती. राज्य सरकार द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष करीत असल्याचा आरोपही काही शेतकऱ्यांनी केला.

महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागायतदार संघाचा रविवारी वाकड (पिंपरी-चिंचवड) येथे वार्षिक मेळावा होता. या कार्यक्रमाचे अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष, ज्येष्ठ नेते शरद पवार होते. वर्षानुवर्षे शरद पवारच या मेळाव्याचे अध्यक्ष असतात. पण, राज्याचे कृषिमंत्री, मुख्यमंत्र्यांची या मेळाव्याला उपस्थिती असते. मात्र, राज्यातील सत्तांतरानंतर शरद पवार यांच्याबरोबर एका व्यासपीठावर येणे सत्ताधारी टाळत आहेत, असे चित्र रविवारी प्रकर्षाने दिसून आले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे रविवारी पुण्यात होते, तरीही त्यांनी मेळाव्याला येणे टाळले. पुण्यात असूनही शिंदे मेळाव्याला आले नाहीत, ही बाब द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांच्या नजरेतून सुटली नाही. याशिवाय उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि कृषिमंत्री अब्दुल सत्तार यांनीही मेळाव्या उपस्थित राहणे टाळले. राज्य सरकारचा प्रतिनिधी म्हणून मेळाव्याला कुणीही उपस्थित नव्हते. एकाच वेळी तिघांनाही मेळाव्याला येता आले नाही, हा नक्कीच योगायोग नाही. जाणीवपूर्वक त्यांनी मेळाव्याकडे पाठ फिरवली आहे, असा सूर शेतकऱ्यांमध्ये होता.

द्राक्ष बागायतदार संघाला झुलवत ठेवले? –

द्राक्ष बागायतदार संघाच्या पदाधिकाऱ्यांकडून मागील तीन आठवड्यांपासून मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि कृषिमंत्र्यांकडे मेळाव्याच्या उपस्थितीबाबत पाठपुरावा सुरू होता. पावसाळी अधिवेशन झाल्यानंतर सांगतो, असा निरोप मिळाल्यामुळे निमंत्रण पत्रिका छापणे गरजेचे असल्यामुळे निमंत्रण पत्रिकेवर या तिघांची नावे छापण्यात आली. अधिवेशन झाल्यानंतरही संघाकडून उपस्थितीबाबत पाठपुरावा करण्यात आला. पण, येणार किंवा नाही, या बाबत ठोस काहीच सांगितले नाही. संघाला अखेरपर्यंत झुलवत ठेवले, अशी माहिती संघाच्या एका पदाधिकाऱ्याने नाव न सांगण्याच्या अटीवर दिली. द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांचे अनेक प्रश्न राज्य सरकारकडे प्रलंबित असल्यामुळे सत्ताधाऱ्यांच्या अनुपस्थितीबाबत अधिकृत मत व्यक्त करणे संघाच्या पदाधिकाऱ्यांनी टाळले आहे.

# मेट्रोच्या खांबांवर चमकोगिरी नको !

## मेट्रो प्रशासनाचा इशारा : पोलीस कारवाई करणार





**पिंपरी।**
**महाईन्यूज । प्रतिनिधी।**

मेट्रोच्या पुणे व पिंपरी-चिंचवड अशा दोन्ही शहरांमधील एकाही खांबावर कोणालाही कसलीही जाहिरात करता येणार नाही. तसे केल्यास त्यांच्यावर पोलिसी कारवाई करण्यात येईल, असा इशारा महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. ब्रिजेश दीक्षित यांनी दिला आहे. दोन खांबांमधील जागेवर पालिकेच्या साह्याने सुशोभीकरण केले जाईल, असेही त्यांनी सांगण्यात आले.

मेट्रोचे खांब ही महामेट्रो कंपनीची मालमत्ता आहे. तिथे जाहिरात करायची नाही, असा महामेट्रोचाच धोरणात्मक निर्णय आहे. त्यामुळे महामेट्रोही त्यावर जाहिरात करणार नाही. अन्य कंपन्यांनाही जाहिरातीसाठी व्यावसायिक वगैरे तत्त्वावर खांब दिले जाणार नाहीत, असे दीक्षित म्हणाले. डॉ. दीक्षित म्हणाले, महामेट्रो ही प्रवासी वाहतूक करणारी कंपनी आहे. खांब हा त्या वाहतुकीमधील महत्त्वाचा घटक आहे. त्याची सुरक्षा अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळेच मेट्रोच्या खांबांवर कुठेही जाहिरात करू दिली जात नाही. दोन खांबांच्या मधील जागा महापालिकेची मालमत्ता आहे. तिचा ताबा महामेट्रोकडे आहे. ही जागा तशीच पडून राहू नये यासाठी महामेट्रोनेच महापालिकेला त्या जागेचे व्यावसायिक वापर करण्याचा प्रस्ताव दिला आहे. त्यात प्रामुख्याने या जागेचे सुशोभीकरण वगैरे करता येईल.

> **“मेट्रोच्या संचालनाला कसलाही त्रास होणार नाही अशा पद्धतीनेच हे सुशोभीकरण असणे बंधनकारक आहे. माती भरून तिथे फुलझाडे लावण्याला त्यात प्राधान्य आहे. त्याच्या बदल्यात संबंधिताला तिथे त्याचा एखादा फलक लावण्याची मुभा दिली जाईल.”**
>
> **– हेमंत सोनवणे, कार्यकारी संचालक, महामेट्रो जनसंपर्क विभाग.**

# राष्ट्रवादीत अतिश बारणेंचा ‘दबदबा’!

## दिग्गज नेत्यांची कार्यालयात भेट : सामाजिक कार्याला वरिष्ठांची दाद

**पिंपरी।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहर उपाध्यक्ष अतिश बारणे यांचा पक्षातील ‘दबदबा’ वाढू लागला आहे. पक्षाचे नेते आणि विरोधी पक्षनेते अजित पवार यांच्यासह माजी गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील यांनीही बारणे यांच्या जनसंपर्क कार्यालयाला भेट दिली.

शहर उपाध्यक्षपदाची संधी मिळाल्यानंतर मोशी आणि परिसरात अतिश बारणे यांची राष्ट्रवादीचा झेंडा फडकत ठेवला आहे. काही दिवसांपूर्वी राज्याचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी पिंपरी-चिंचवडचा दौरा केला. त्यावेळी बारणे यांच्या निवासस्थानी त्यांनी स्नेहभोजन केले.

### दिलीप वळसे-पाटलांकडून कौतूक...

**अतिश बारणे यांनी विविध सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. रक्तदान शिबीर, वृक्षारोपण, रुग्णवाहिका लोकार्पण, कोविड काळात केलेली मदत, शालेय साहित्य वाटप, महिला सक्षमीकरणासाठी विविध योजना, धार्मिक आणि सामाजिक उपक्रमांद्वारे लोकसेवेचा वसा जपला आहे. या सर्व उपक्रमाचे माजी गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील यांनी कौतूक केले.**

शिरुर लोकसभा मतदार संघाचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनीही अनेकदा बारणे यांच्या उपक्रमांमध्ये सहभाग घेतल्याचे पहायला मिळते.

राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर, मावळचे आमदार सुनील शेळके, पारनेरचे आमदार निलेश लंके यांच्यासारखी राष्ट्रवादीची दिग्गज मंडळी अतिश बारणे यांच्या थेट संपर्कात आहे. किंबहुना, राज्य स्तरावरील मातब्बर मंडळी बारणेंच्या विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सहभाग घेतला आहे. त्यामुळे बारणे यांचा पक्षातील वरिष्ठांच्या ‘गुड बॉक्स’मध्ये स्थान मिळवल्याचे पहायला मिळत आहे.



## संपादकीय »

# उभे अन् आडवे!

***राजधानी दिल्लीजवळच्या 'नॉएडा'तील सर्व व्यवस्था, यम-नियम खुंटीवर टांगून चांगल्या ३० मजल्यांपर्यंत उभ्या राहिलेल्या दोन इमारती अखेर पाडल्या गेल्या. त्यांचे पाडणे आणि पडणे हा जणू रविवारचा राष्ट्रीय सोहळाच.***

सुटीच्या दिवशी असे काही पाहायला, फॉरवर्ड करायला मिळणे आणि पाठोपाठ भारत-पाकिस्तान 'टी२०' सामना यामुळे घराघरांतून आनंदाचे पूर आल्याने सारा आसमंत आनंदतरंगांत बुडून गेला. या इमारतींचे पडणे आणि नंतर भारताने पाकिस्तानला पाडणे हे दोन्ही क्षण अतिशय उत्साहात देशभर साजरे झाले. यातील पाकिस्तानी पराभवानंतरचा आनंदातिरेक सहज आणि अपेक्षितही. पण दिल्लीतील या इमारतींचे मनोरे जमीनदोस्त होत असताना हजारो जण आनंदाने चीत्कारताना पाहून हसावे की रडावे असा प्रश्न पडला. कसला आनंद म्हणायचा हा? तुमच्या-आमच्यासारख्या अनेकांनी जेथे आपल्या स्वप्नातल्या घरासाठी कमाई घालवली आणि तरीही त्यांना घर मिळाले नाही, याचा हा आनंद? की अनेकांस अशा परिस्थितीस तोंड द्यावे लागत असताना 'नॉएडा'तील या दोन गगनचुंबी इमारतींतील गृहग्राहकांना आता तेथे कधीच घर मिळणार नाही; याचा हा आनंद? सर्व नियामक यंत्रणांस खुंटीवर टांगून व्यवस्थेच्या छाताडावर इतक्या प्रचंड इमारती उभ्या राहिल्या, त्या उभ्या राहत असताना मधल्या टप्प्यात अनेकांचे हात ओले झाले, अनेक अधिकाऱ्यांची धन झाली आणि तरीही हे मनोरे पडले – याचा तर हा आनंद नाही? या इमारतींच्या विकासकाने अनेक सरकारी अधिकाऱ्यांच्या चहापाण्याची व्यवस्था केली, तरीही कारवाई होऊन या इमारती पाडल्या गेल्या त्यामुळे सदरहू विकासकाचे तेलही गेले आणि तूपही गेले याचा हा आनंद मानावा काय? चला, यानिमित्ताने एक तरी बेकायदा बांधकाम पाडले गेले याबद्दलचे तर हे समाधान नव्हे? वास्तविक या मनोऱ्यांचे उभे राहणे आणि पाडले जाणे हे दोन्ही सामाजिक शरम वाटावी असे घटक. या शरमेच्या जाणिवेचा लवलेशही हे पाडकाम साजरे होत असताना दिसला नाही. एखाद्या अट्टल गुन्हेगारास शिक्षा झाली म्हणून ज्याप्रमाणे गुन्हेगारी कमी होतेच असे नाही, त्याप्रमाणे एखादी इमारत पाडली म्हणून आपल्या देशात बेकायदा बांधकाम अजिबात कमी होत नाही. ज्या परिसरात या इमारती उभ्या होत्या त्याच परिसरात अजूनही अशी बेकायदा बांधकामे शेकडय़ांनी आढळतील. ती सर्व भूतकाळात उभी राहिली हे त्यांचे समर्थन असू शकत नाही. याचे कारण अशा इमारतींची बेकायदा उभारणी वर्तमानातही अव्याहत सुरू आहे आणि व्यवस्था अशीच राहिली तर भविष्यातही ती बंद होण्याची शक्यता नाही.



## आनंदी सकाळ

### मन का मैला न जाय।

'न्हाये धोये तो क्या हुआ, मन का मैला न जाय। मीन सदा जल में रहे, धोये बांस न जाय।' मासा सदैव पाण्यात राहतो; पण कितीही साबणाने धुतले, तरी त्याचा वास जात नाही. अंघोळ केल्याने देहाची स्वच्छता वाढते, मनाची नाही. मनाची अंघोळ म्हणजे उपासना. उपासना तन्मयतेने केली, तर मनाचे तिन्ही दोष जातात. ज्याचे मल आणि विक्षेप दोष जातात, त्याच्या दारी गुरू येतात. गुरू तर कृपेसाठी तयारच असतात. सूर्य उगवल्यावर त्याची किरणे दरवाजातून येतातच; पण आपल्याला त्याची किरणे नको असतात. आपण दरवाजा बंद करून टाकतो. यात दोष सूर्याचा नाही. दार उघडले, तर सूर्याची किरणे स्वागत करायला तयारच आहेत, फक्त दार उघडण्याचा विलंब आहे. तसे मल आणि विक्षेप हे दोष निघून गेले, म्हणजे तुमचे दार उघडले. दार उघडले, की आवरण दोष काढण्यासाठी सद्गुरू आपल्यासमोर आहेतच.

# आझादांची गुलामी : नक्की काय आहे गुढ!




संपन्नावस्थेतून विपन्नावस्थेत जावे लागले की संपन्न इतिहासातील गुण विपन्न वर्तमानात दुर्गुण ठरतात. हा मानवी स्वभाव आहे. त्याचेच दर्शन गुलाम नबी आझाद यांच्या काँग्रेस पक्षाच्या राजीनाम्यातून घडते. हा राजीनामा देताना त्यांनी जो पाच पानी प्रदीर्घ प्रबंध लिहिला त्याची चर्चा काही काळ सुरू राहील. विशेषत: काँग्रेस नेतृत्वावर त्यांनी जे धारदार शरसंधान केले आहे त्याची चर्चा अधिक असेल. या शरवर्षांवात काँग्रेस नेतृत्व किती विदग्ध होईल हे सांगता येणे अवघड. पण त्यामुळे काँग्रेस विरोधकांच्या अंगणात मात्र पुष्पवृष्टीचा आनंद लुटला जाईल.



हेदेखील मानवी. प्रतिस्पर्ध्याच्या अहितात आनंद शोधणे हा मानवी स्वभाव. त्यात गैर काही नाही. ही मानवी स्वभावदर्शक लक्षणे दूर सारत आझाद यांचा राजीनामा, त्यामागील संभाव्य कारणे आणि परिणाम यावर भाष्य करणे आवश्यक ठरते. पहिला मुद्दा काँग्रेसच्या विद्यमान विपन्नावस्थेचा. आझाद यांनी काँग्रेसची सधन संपन्नता अनुभवलेली आहे. त्यांना त्यामुळे ही विपन्नावस्था अधिक टोचणे साहजिक. ही टोच त्यांच्या राजीनामा पत्रातून दिसते. काँग्रेसचे विद्यमान नेतृत्व – पक्षी : राहुल गांधी – सहकाऱ्यांशी वाद-संवाद न करता परस्पर निर्णय घेते, ज्येष्ठांना किंमत देत नाही, राहुल यांच्या वागण्यातील पोक्तपणाचा अभाव हे तीन आझाद यांच्या पत्रातील प्रमुख मुद्दे. त्यांच्या वैधतेबाबत कोणाचेही दुमत असणार नाही.

विजयानंतर जय शाहांनी तिरंगा पकडण्यास दिला नकार! मैदानातील VIDEO VIRAL; विरोधक म्हणतात,

"जर ही गोष्ट..."

आझाद यांची कारकीर्द इंदिरा गांधी यांच्या कार्यकाळात सुरू झाली. मुळात संजय गांधी यांच्या जवळचे ते कश्मिरी नेते. शेर-ए-कश्मीर शेख अब्दुल्ला यांच्या वारसांपेक्षा आपल्या पक्षातच एखादा कश्मिरी चेहरा असावा हा आझाद यांना जवळ करण्यामागे तत्कालीन काँग्रेस नेत्यांचा विचार. असा विचार सर्व राजकीय पक्ष करीत असतात त्यामुळे त्यात गैर असे काही नाही. तथापि यातील महत्त्वाचा मुद्दा असा की ज्या काळात आझाद काँग्रेसमध्ये आले त्या काळातील काँग्रेसच्या सर्वोच्च नेत्या इंदिरा गांधी या पक्षांतर्गत चर्चेसाठी कधी ओळखल्या जात होत्या? तसेच त्यांनीही त्यांच्या काळातील काँग्रेस द्रुढ्ढाचार्यांना घरी पाठवले. त्या वेळी आझाद हे तरुण तुर्कात गणना होण्याइतकेही 'मोठे' नव्हते. पण इंदिराबाईंनी या ज्येष्ठांस घरी पाठवले म्हणून त्यांच्यासाठी आझाद यांनी अश्रू ढाळल्याची काँग्रेसी इतिहासात नोंद नाही. इंदिरा गांधी यांनी राजकीय यशोशिखरावर असताना आणीबाणी लादली. ती लादावी किंवा कसे यावर त्या वेळी काय पक्षात परिसंवाद झाला होता काय?

# लोकानुकूल ः प्रवासी का आले अटितटीला..

कोलकाता शहराचे नाव कलकत्ता असे होते तेव्हाची गोष्ट. त्या काळी तिथे मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे सरकार होते. सरकार साम्यवादी असले, तरी वाढते इंधन दर- एकंदर महागाई अशा कारणांमुळे पाचसहा वर्षांच्या खंडानंतर तरी शहरातील बस सेवेचे तिकिट दर वाढवावेच लागत.

मार्क्सवादी पक्षाचे मतदार मग कामगार असोत वा बेरोजगार असोत, 'जगातील कामगारांनो एक व्हा' या घोषणेप्रमाणे एकत्र रस्त्यांवर उतरत, बस गाडय़ा अडवण्याचा उपक्रम दिवसभर; तर एखादी बस पेटवूनच देण्याचा कार्यक्रम दिवसातून दोनतीनदा चाले. चित्रवाणी वृत्तवाहिन्या नव्हत्या, पण छापील दैनिके काढणाऱ्या साऱ्याच वृत्तसमूहांची कार्यालये कलकत्त्यात असल्याने महाराष्ट्रातील दैनिकांमध्ये कलकत्त्यात जाळलेल्या बस गाडीचे छायाचित्र आणि 'आंदोलनानंतर बस गाडय़ांच्या तिकीट दरांचा फेरविचार' अशी बातमी दुसऱ्या दिवशी आलेली असे. अशा दिवशी मुंबईच्या 'बेस्ट' बस गाडीत हमखास कुणी तरी कुणाला तरी म्हणे, "ते बघ कसे रस्त्यावर उतरतात-नाही तर आपण!" या संभाषणाशी संबंध नसलेला, पण मोठय़ाने कोण बोलते आहे बघण्यासाठी मान मागे वळवणारा तिसराच एखादा मुंबईकर, बोलणाऱ्याकडे पाहून सभ्यसे स्मितहास्य



करी. विषय तिथेच संपे. पण नव्वदच्या दशकात मुंबईच्या पश्चिम रेल्वेवरही लोकल गाडय़ा रेल्वेच्याच चुकीमुळे उशिराने धावल्या म्हणून स्थानकाची मोडतोड करणे यांसारखे प्रकार होऊ लागले. 'म्हणून गाडय़ा जरा तरी वेळेवर धावतात' असे सांगण्यात तेव्हाचे प्रवासी धन्यता मानू लागले. प्रवाशांचा विचार न करता घेतलेले निर्णय बदलले जावेत, हे चांगलेच. वास्तविक त्यासाठी कोणीही हिंसक होण्याचे काहीच कारण नसते. पण प्रवासी अटीतटीला आल्याचे दिसल्यानंतरच फरक पडतो, असे अगदी सरत्या आठवडय़ातही घडले.

मुंबईतील दहा वातानुकूल उपनगरी गाडयांच्या फेऱ्या रद्द करण्याचा निर्णय या आठवडय़ात झाला तो कळवा आणि बदलापुरातील प्रवाशांनी संघटित ताकद दाखवल्यानंतर. ठाणे आणि डोंबिवलीच्या पाठोपाठ जिथे स्थायिक होण्यास मध्यमवर्गाची पसंती असते, तीही कळवा आणि बदलापूर उपनगरे. डोंबिवलीतून वातानुकूल उपनगरी सेवेला उत्तम प्रतिसाद मिळतो, असे सेंट्रल रेल्वेचे म्हणणे आहे. पण म्हणून बदलापुरातून तेवढाच प्रतिसाद या सेवेला मिळेल असे नाही. रेल्वे ही सरकारी असली तरी कंपनीसारखी चालते. रेल्वेखात्याला कंपनी मानणारे आणि 'रेल्वे अर्थसंकल्प जनतेसमोर मांडणे' वगैरे प्रथा बंद करणारे आज सत्तेवर आहेत. या सत्ताधाऱ्यांनी जे केले ते योग्यच, असे मानणारा वर्ग तर सर्वदूर आहे. तरीसुद्धा आंदोलन झाल्यानंतरच 'सेवा उत्तम हवी तर पैसे मोजा' हे तत्त्व सर्वांना सर्वकाळ सारखेपणाने मान्य होऊ शकणारच नसते कारण सेवा घेणारा समाज हा एकसारखा नसतो. त्या समाजाच्या अमुकच तुकडय़ाला आम्ही सेवा देणार, हा भेदभाव बऱ्याच ठिकाणी चालत नाही.

## ।। अभंगवाणी ।।



पवित्र सोंवळीं ।  
एक तीं च भूमंडळीं ॥१॥  
ज्यांचा आवडता देव ।  
अखंडित प्रेमभाव ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी गाळा क्रमांक 79-80 छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, संत तुकाराम नगर, अग्निशमन केंद्रासमोर, पिंपरी, पुणे - 411018. **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# पवारांचा मोदी सरकारवर हल्लाबोल !

## अच्छे दिन'वरुन टोला तर बिल्कीस बानो प्रकरणावरुन लाल किल्ल्यावरील भाषणाची करुन दिली आठवण

**सातारा । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी केंद्रामध्ये सत्तेत असणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारवर कठोर शब्दांमध्ये टीका केली. मोदी सरकारने सत्तेत आल्यापासून दिलेली आश्वासने आणि त्या आश्वासनांसंदर्भातील सध्याची आकडेवारी पवार यांनी पत्रकारांसमोर मांडली. पवार यांनी बिल्कीस बानो, केंद्रीय यंत्रणांचा वापर यासारख्या विषयांवरुनही केंद्रातील भाजपा सरकारला लक्ष्य केलं.

“आव्हाडांनी राज्यात ज्या पद्धतीने काम केलं ते पक्षाच्या दृष्टीने, जनहिताच्या दृष्टीने अत्यंत अनुकूल झालं. आज ज्यांच्या हातात देशाची आणि राज्याची सुत्रं आहेत हे सगळ्या एका विचाराचे आहेत. लोकांना काही विश्वास देण्याच्या संबंधातील त्यांची भूमिका दिसत नाही,” असं म्हणत पवारांनी भाजपाकडून जनतेमध्ये संभ्रम निर्माण केला जात असल्याचं म्हटलं आहे. तसेच यापुढे पवार यांनी



केंद्रामध्ये भाजपा सरकार सत्तेत आल्यापासूनच्या आश्वासनांचा पाढाच वाचून दाखवला. तसेच सध्याच्या स्थितीला त्या आश्वासनांचं काय झालं आहे याबद्दलही पवार यांनी मिहिती दिली. “केंद्राच्या सत्ताधारी पक्षाने केली. अनेक आश्वासनं देण्यात आलेली आहेत. आश्वासनांच्या पुरततेचा आढावा घेतला तर त्यात समाधानकारक दिसत नाही. २०१४ मध्ये निवडणुकीला सामोरं जाताना सत्ताधाऱ्यांनी अच्छे दिनची घोषणा केलेली. किंमती कमी होतील बोलेले होते. त्यानंतर अच्छे दिन नागरिकांना जावणले नाहीत,” असा टोला पवारांनी २०१४ च्या आश्वासनांसंदर्भात बोलताना लगावला. पुढे बोलताना पवार यांनी, “नंतरच्या निवडणुकीला अच्छे दिनचा विसर पडला नंतर न्यू इंडियाचा विश्वास दिला गेला. आता २०२४ संदर्भात फाइव्ह ट्रिलियन इकमॉनमी आम्ही करु असा विश्वास द्यायचा प्रयत्न केला आहे,” असंही म्हटलं.

“आपण हे पाहिलं तर या सर्व आश्वासनांची १०० टक्के त्याची पूर्तता झाली असं दिसत नाही. ज्या कार्यक्रमाची आश्वासन दिली त्यामध्ये २०१८ मध्ये प्रत्येक ग्रामपंचयतीमध्ये इंटरनेट असेल २०२२ पर्यंत असं सांगण्यात आलेलं. डिजिटल इंडियाचा विश्वास देशाच्या नेतृत्वाने दिला खरा पण याबद्दल काही होताना दिसलं नाही. देशातील सर्व ग्रामपंचायतींबद्दल दावा करण्यात आलेला. यासंदर्भात संसदेमध्ये मनोज सिन्हा म्हणझेच स्टेट कम्युनिकेशन मंत्र्यांनी सांगितलं की, आम्ही अडीच लाख ग्रामपंचायतींपर्यंत २०१९ पर्यंत पोहचू असं सांगण्यात आळेलं पण पूर्तता झाली नाही. अर्थमंत्री सितारामन यांनी भारत बेस ब्रॉडबॅण्ड २०२५ पर्यंत पूर्ण करु असं सांगितलं आहे. म्हणजे हे आश्वासन पूर्ण झालेलं नाही,” असं पवार म्हणाले.

“दुसरं आश्वासन दिलं १०० टक्के डिजीटल लिट्रसी २०२२ पर्यंत करु. केंद्राची आताची माहिती असं सांगिते की आजच्या आकडेवारीनुसार ३३ टक्केच्या महिला आणि ७० टक्के पुरुषांना ही संधी उपलब्ध झालेली आहे. २०२२ पर्यंत प्रत्येक नागरिकाला शौचालयाची सुविधा उपलब्ध करुन दिली जाईल असंही सांगितलेलं. रिहॅबमध्ये ५६.६ घरांमध्ये टॉयलेट नाहीत. देशात ३० टक्के लोकांना शौचालये उपलब्ध नाहीत. आणखीन एक घोषणा करताना २०२२ पर्यंत प्रत्येक नागरिकाकडे घर असेल असा दावा करण्यात आलेला. याबद्दल विचारलं असता प्रश्न क्रमांक २७३२ अंतर्गत अशी माहिती मिळाली की प्रत्येकाला घर मिळालेलं नाही. ५८ लाख घरं बांधण्यात आलेली आहे. लोकसंख्येच्या ३० टक्के लोकांनाही घरं दिलेली नाही,” असं पवार यांनी सांगितलं.

“प्रत्येकाला पिण्याचं पाण्याचं कनेक्शन मिळेल २०२२ ची लिमीट २०२४ पर्यंत वाढवत असल्याचं सांगण्यात आलं. हे ही आश्वासन पाळलं नाही. प्रत्येक भारतीयाला २४ तास वीज मिळेल २०२२ पर्यंत असं सांगितलं होतं. मात्र आता ऊर्जामंत्र्यांनी दिलेल्या माहितीमध्ये याचा रिव्हाइज कार्यक्रम घेतला जाईल. सध्या ६६ टक्के लोकांना वीजेची व्यवस्था झालेली आहे. ३४ टक्के लोकांना अजून वीज नाही असं उत्तर दिलेलं आहे,” असंही पवार म्हणाले. “सगळं सांगायला गेलो तर एक तास लागेल. याचा अर्थ एकच दिसतोय. दिलेली आश्वासनं पाळल्या गेलेल्या नाहीत,” अशी खंत पवार यांनी व्यक्त केली.

बिल्कीस बानो प्रकरणावरही पवार यांनी भाष्य केलं. “महिला अत्याचारासंदर्भातील संख्या दिवसोंदिवस वाढत आहे. गुजरातमध्ये बिल्कीस बानो यांच्यावर अत्याचार झाला हे सगळ्या देशाला माहिती आहे. त्यांच्यावर बलात्कार केला, त्यांच्या मुलांसहीत नातेवाईकांची हत्या केली. त्यात खालचं कोर्ट, सेशन कोर्ट, सुप्रीम कोर्टाला कठोरातील कठोर शिक्षा दिली. त्यानंतर ती शिक्षा जन्मठेप झाली. ही जन्मठेप आजन्म होती. असं असतानाही गुजरातच्या भाजपा सरकारने असा निर्णय घेऊन त्यांना सोडलं. नुसतं सोडलं नाही तर त्यांचा जाहीर सत्कार केला. याचं मला आश्चर्य वाटतं,” असं पवार म्हणाले.

पवार यांनी बिल्कीस बानो प्रकरणावरुन पुढे, “देशाच्या पंतप्रधानांचं भाषण मी नीट ऐकलं. आग्रहाने मोदींनी महिलांना सन्मान देण्यासंदर्भातील भूमिका मांडली. ते ज्या राज्यातून येतात. त्याच राज्यातील त्यांच्याच विचाराच्या सरकाने न्यायालयीन शिक्षा सुनावलेली असतानाही आरोपींना मुक्त केलं.

---

# अंबानींची मोठी घोषणा! देशात उभारणार जगातील सर्वात मोठं ५ जी नेटवर्क

## दोन लाख कोटींच्या गुंतवणुकीचा उल्लेख

**। मुंबई । महाईन्यूज । विशेष प्रतिनिधी ।**

देशातील सर्वात मोठी कंपनी असलेल्या रिलायन्सच्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये फाइव्ह जीसंदर्भात मोठी घोषणा करण्यात आली आहे. या सभेमध्ये आपल्या भाषणात रिलायन्स समुहाचे प्रमुख मुकेश अंबानी यांनी जगभरातील गुंतवणुकदारांचं लक्ष लागलेल्या भाषणामध्ये ही घोषणा केली. रिलायन्सची सर्वसाधारण सभा दुपारी दोन वाजता सुरू झाली. मुकेश अंबानी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सभेला संबोधित करताना फाइव्ह जीमध्ये दोन लाख कोटींची गुंतवणूक करणार असल्याची घोषणा केली. तसेच जीओचं फाइव्ह जी नेटवर्क हे जगातील सर्वात मोठं फाइव्ह जी नेटवर्क असेल असंही यावेळेस मुकेश अंबानी यांनी म्हटलं आहे. मुकेश अंबानींनी जिओ फाइव्ह जीची घषणा करताना, “मला या ठिकाणी एक घोषणा करायची आहे.




जीओच्या वाटचालीमधील हा पुढील टप्पा असून डिजीटल कनेक्टेव्हीटी खास करुन फिक्स ब्रॉडबॅण्डच्या क्षेत्रातील हे महत्वाचं पाऊल आहे, ज्याचं नाव आहे जीओ फाइव्ह जी. फाइव्ह जीच्या माध्यमातून आपण १०० मिलियन घरांना जोडणार आहेत. यापूर्वी कधीही न अनुभवलेली कनेक्टीव्हीटी या माध्यमातून स्मार्ट होम सोल्यूशन्स उपलब्ध करुन देईल,” असा विश्वास व्यक्त केला. जीओ फाइव्ह जीची सेवा दिवाळीपासून सुरु होईल. ही पहिल्या टप्प्यातील सेवा असेल. सुरुवातीला केवळ चार शहरांमध्ये ही सेवा सुरु केली जाईल. दिवाळीच्या कालावधीमध्ये या सेवेचा शुभारंभ होईल. दिल्ली, मुंबई, चेन्नई, कोलकात्यामध्ये ही सेवा पुरवली

---

# अखेर अध्यक्षनिवड ऑक्टोबरमध्ये ; काँग्रेस कार्यसमितीच्या बैठकीत निवडणूक कार्यक्रम निश्चित

## अखेर ऑक्टोबरमध्ये काँग्रेसला नवा अध्यक्ष मिळणार

**। नवी दिल्ली । महाईन्यूज ।**

अनेकदा लांबणीवर गेलेली बहुप्रतीक्षित काँग्रेस अध्यक्षपदाची निवडणूक आता येत्या १७ ऑक्टोबरला होणार आहे. काँग्रेस कार्यसमितीच्या बैठकीत रविवारी याबाबतचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे अखेर ऑक्टोबरमध्ये काँग्रेसला नवा अध्यक्ष मिळणार आहे

या निवडणुकीची अधिसूचना २२ सप्टेंबरला काढण्यात येणार असून, अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया २४ सप्टेंबर रोजी सुरू होईल ३० सप्टेंबरला त्याची अंतिम मुदत संपुष्टात येईल, असे काँग्रेसच्या पक्षांतर्गत निवडणूक यंत्रणेचे अध्यक्ष मधुसूदन मिस्त्री यांनी कार्यसमितीच्या बैठकीनंतर पत्रकारांना सांगितले. काँग्रेस पक्षाध्यक्ष निवडणुकीचा कार्यक्रम एकमताने मंजूर करण्यात आला. वैद्यकीय तपासणीसाठी सध्या परदेशात असलेल्या पक्षाध्यक्ष



सोनिया गांधी यांच्या अध्यक्षतेखाली दूरदृश्यप्रणालीद्वारे (ऑनलाइन) रविवारी झालेल्या कार्यसमितीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या वेळी सोनियांबरोबर राहुल आणि प्रियांका गांधी उपस्थित होत्या.

काँग्रेस कार्यसमितीने गेल्या वर्षी निश्चित केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार अध्यक्षपदासाठीची निवडणूक प्रक्रिया २१ ऑगस्ट ते २० सप्टेंबरदरम्यान पूर्ण करण्याचे नियोजन केले होते. मात्र, ही निवडणूक लांबणीवर गेली आता उमेदवारी अर्ज छाननीची तारीख १ ऑक्टोबर, अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख ८ ऑक्टोबर असेल. एकापेक्षा जास्त उमेदवार असल्यास निवडणूक १७ ऑक्टोबर रोजी होईल. मतमोजणी आणि निकाल १९ ऑक्टोबर रोजी जाहीर करण्यात येईल. “मिस्त्री यांनी मांडलेला निवडणूक कार्यक्रम कार्य समितीच्या सर्व सदस्यांनी एकमताने मंजूर केला, असे पक्षाचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी सांगितले. अशा प्रकारे लोकशाही प्रक्रियेतून पक्षांतर्गत विशेषत: अध्यक्षपदाच्या निवडणुका नियमितपणे घेणारा काँग्रेस हा एकमेव पक्ष आहे,” असे रमेश म्हणाले. राहुल गांधींनी २०१९च्या लोकसभा निवडणुकीतील पराभवानंतर काँग्रेस अध्यक्षपदाचा राजीनामा दिला होता.

तेव्हापासून सोनिया गांधी यांच्याकडे हंगामी अध्यक्षपदाचा कार्यभार आहे. पक्षाच्या अध्यक्षपदासाठीची यापूर्वीची निवडणूक २००० च्या नोव्हेंबरमध्ये झाली होती. सोनिया गांधी १९९८ पासून सर्वाधिक काळ काँग्रेसच्या अध्यक्षपदी होत्या. २०१७ ते २०१९ अशी दोन वर्षे राहुल गांधींनी ही धुरा सांभाळली होती. त्यावरून काँग्रेसमध्ये घराणेशाही असून, गांधी घराण्याचे काँग्रेसवर संपूर्ण नियंत्रण असल्याची टीका भाजपतर्फे सातत्याने केली जाते.

# विद्यार्थ्यांच्या पाठीवरचे ओझे कमी होणार!

## दीपक केसरकरांची माहिती

**मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।**



विद्यार्थ्यांच्या पाठीवरील दफ्तराचे ओझे कमी करण्यासाठी पाठ्यपुस्तकाचे तीन भाग केले जाणार आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या पाठीवरचे ओझे कमी होईल, असे शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी सोमवारी येथे सांगितले. गणेशोत्सवाच्या काळात शालेय विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेऊ नयेत, या मागणीसाठी मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी आज केसरकर यांची भेट घेतली. त्यावेळी बोलताना केसरकर म्हणाले की, सर्व शाळांमध्ये आगामी शैक्षणिक वर्षापासून पहिलीपासूनच द्विभाषिक पाठ्यपुस्तके देण्यात येतील. त्यासाठी एकात्मिक पुस्तक संकल्पना राबवण्यात येणार आहे. त्यामध्ये वेगवेगळ्या विषयांचे धडे एकत्र करून एक पुस्तक तयार करण्यात येणार आहे. पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांना शाळेत जाताना दप्तराचे ओझे कमी व्हावे, यासाठी सात विविध विषयांची पुस्तके एकाच वेळी शाळेत नेण्याऐवजी संपूर्ण अभ्यासक्रमाची तीन भागात विभागणी करून एकच पुस्तक न्यावे लागणार आहे. हे पुस्तक तयार करताना गणित आणि विज्ञान या विषयांत ठिकठिकाणी मराठीबरोबरच इंग्रजीतील संकल्पनांचाही वापर केल्याने विद्यार्थ्यांना आता द्विभाषिक पाठ्यपुस्तक या शैक्षणिक वर्षापासून उपलब्ध होत आहे. यासाठी शिक्षण विभागाने 'एकात्मिक पाठ्यपुस्तक योजना' तयार केली असून, तिची अंमलबजावणी २०२२-२३ या शैक्षणिक वर्षापासून सुरू होणार आहे, अशी माहिती केसरकर यांनी दिली. दरम्यान, सर्वोच्च न्यायालयातील सत्तासंघर्षाचे प्रकरण आणखी पाच वर्ष चालेल, असे विधान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाचे आमदार भरत गोगावले यांनी केले आहे.

# महाराष्ट्र पिंजून काढत सरकारविरोधात रान पेटवणार!

## शरद पवारांची मोठी घोषणा

**मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।**



राज्यात महाविकास आघाडी कोसळल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार हे ॲक्शन मोडवर आले आहेत. शरद पवार यांनी आज ठाण्यात पत्रकार परिषद घेत केंद्र आणि राज्य सरकारवर जोरदार टीका केली आहे. केंद्रातील भाजप सरकारने याआधी देशवासियांना दिलेली अनेक आश्वासने पूर्ण केली नाहीत. त्यामुळे राज्यातील काही जिल्ह्यांचा दौरा करून आढावा घेणार आहेत, असं शरद पवार म्हणाले.

**ईडीसारख्या यंत्रणांचा वापर करून सत्ता मिळवण्याचा प्रयत्न सुरू**

माणसं फोडणं, साधणांचा वापर करणं आणि ईडीसारख्या यंत्रणांचा वापर करून सत्ता मिळवण्याचा प्रयत्न सुरू असल्याचं गंभीर चित्र या देशासमोर आज दिसत आहे. गुजरातमध्ये बिल्कीस बानो यांच्यावर अत्याचार झाला हे संपूर्ण देशाला माहित आहे. त्यामध्ये सेशन कोर्ट, उच्च न्यायालय, आणि सर्वोच्च न्यायालय यांनी कठोर शिक्षा दिली. आजन्म कारावास देण्यात आला होता. त्यानंतर ती जन्मठेपेत वर्ग केली. आता गुजरात सरकारने त्यांना सोडले आणि त्यांचा जाहीर सत्कार केला, असं पवार म्हणाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे १५ ऑगस्टचे भाषण ऐकले, त्यामधे स्त्री वर्गाबाबत ते बोलले. मात्र, त्यांच्याच राज्यांत महिलांवर अत्याचार करणाऱ्या आरोपींना सोडण्यात आले. २०१४ मध्ये निवडणुकीला सामोरं जाताना सत्ताधाऱ्यांनी अच्छे दिनची घोषणा केली होती. किंमती कमी होतील बोलेले होते. त्यानंतर अच्छे दिन नागरिकांना जाणवले नाहीत, असं पवार म्हणाले.

### ठाणे जिल्ह्यावर विशेष लक्ष देण्याची गरज

**मी महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांचा दौरा करून आढावा घेणार आहे. ठाणे जिल्ह्यावर विशेष लक्ष देण्याची गरज आहे. आगामी निवडणुका महाविकास आघाडी म्हणून एकत्र लढावी, असं आमचं मत आहे, पण त्यावर निर्णय झालेला नाही. आम्ही एकत्र निवडणुकीला सामोरं जावं का याची चाचपणी करत आहोत, पण अजूनही निर्णय झालेला नाही, असं पवार म्हणाले.**

# ...तर सर्वच राज्यात आमदारांची फोडाफोडी!

## सत्ता संघर्षवरील निकाल लांबल्याने जयंत पाटलांकडून चिंता व्यक्त

**।वर्धा । महाईन्यूज । विशेष प्रतिनिधी ।**



राज्यातील सत्ता संघर्ष सर्वोच्च न्यायालयात पोहचला आहे. प्रकरणाची सुनावणी सतत पुढे ढकलली जात आहे. न्यायाला जेव्हा उशीर होतो, तेव्हा 'जस्टीस डीले, जस्टीस डेनाय' असे म्हटले जाते. असे झाले तर सर्वच राज्यात आमदार फोडाफोडीचे राजकारण मोठ्या प्रमाणात होईल, असे मत राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी व्यक्त केले.

वर्धा दौऱ्यात त्यांनी पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक घेतली. यावेळी ते बोलत होते. पाटील म्हणाले, सर्व काही साम, दाम, दंड, भेदाने करता येते, ही वृत्ती निर्माण झाल्यास पालिका निवडणुकीससुद्धा उभे राहण्याचे धाडस कुणी करणार नाही. राज्यातील सत्ता संघर्षाचा निवाडा करायाला आता खंडपीठ स्थापन झाले आहे.

खंडपीठाच्या विवेकावर आपण अवलंबून राहू. ते काही तरी निर्णय घेतील, असेही पाटील म्हणाले.

# आनंददायी ः सत्तांतरानंतर राज्यात बुलेट ट्रेन प्रकल्पाला कमालीची गती

**मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

ठाकरे सरकारच्या काळात रेंगाळलेल्या बुलेट ट्रेन प्रकल्पाला (Mumbai Ahmedabad Bullet Train Project ) आता शिंदे-फडणवीस सरकारच्या काळात गती मिळाली आहे. आतापर्यंत राज्यातील ९४.३७ टक्के भूसंपादन प्रक्रिया (Land Acquisition) पूर्ण झाली असून ९७.४७ टक्के एकूण भूसंपादन पूर्ण झाले आहे. त्यामुळे मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्प लवकरच पूर्णत्वास जाण्याची शक्यता आहे. केंद्र सरकारचा हा अतिमहत्त्वकांक्षी प्रकल्प आहे.

मुंबईला अहमदाबादेत अवघ्या तीन तासांत जोडणाऱ्या बुलेट ट्रेन प्रकल्पाला तत्कालीन युती सरकारने मान्यता दिली होती. भाजपाचा हा अतिमहत्त्वकांक्षी प्रकल्प आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील भाजपाने या प्रकल्पासाठी जोर लावला होता. मात्र, ठाकरे सरकारच्या काळात भूसंपादन प्रक्रिया रखडली होती. ठाकरे सरकार या प्रकल्पाविरोधात असल्याने त्यांनी प्रकल्पासाठी उचित सहकार्य केले नाही. परिणामी प्रकल्प रखडला. दरम्यान, कोरोनाच्या पार्श्वभूमीवर प्रकल्पाचे काम रेंगाळले. अखेर शिंदे-फडणवीस सरकारच्या काळात या प्रकल्पाने वेग घेतला आहे. नव्या सरकारने मेट्रो आणि बुलेट ट्रेन प्रकल्प प्राधान्याने करण्याच्या सूचना दिल्या आहेत.



### भूसंपादन प्रक्रिया जवळपास पूर्ण

बुलेट ट्रेन प्रकल्पासाठी राज्यातील वन विभागाच्या अखत्यारित असलेली जागा वापरण्यात येणार आहे. त्यामुळे या जागेच्या वापरासाठी राज्य सरकारने केंद्राकडे प्रस्ताव पाठवला होता. केंद्रीय पर्यावरण विभागाने हा प्रस्ताव मंजूर केला आहे. त्यानुसार, ९५ हेक्टर जमिनीवर बुलेट ट्रेनचे होणार आहे. महाराष्ट्रातील ४३३.८२ हेक्टर जमिनीवर बुलेट ट्रेनचे काम होणार असून यापैकी ४०७ हेक्टर जमिनीचे अधिग्रहण प्रक्रिया पूर्ण झाली असल्याची माहिती, नॅशनल हायस्पीड रेल कॉर्पोरेशनच्या अधिकाऱ्यांनी दिली.

दरम्यान, राज्यातील अधिग्रहण आणि भूसंपाद प्रक्रिया जवळपास पूर्ण होत आली आहे. तर, दादरा-नगर हवेलीमधील १०० टक्के, गुजरातमध्ये ९८.८ टक्के जमीन संपादित झाली आहे. या तीन राज्यातील एकूण १ हजार ३९६ हेक्टर जमिनीवर बुलेट ट्रेन प्रकल्प साकारण्यात येणार आहे. यापेकी, यापैकी ९७.४७ टक्के अर्थात १,३५४ हेक्टर जमिन अधिग्रहणाची प्रक्रिया पूर्ण झालेली आहे, अशी माहिती 'एनएचएसआरसीएल'ने दिली. बुलेट ट्रेन प्रकल्पासाठी वांद्रे-कुर्ला संकुलात भूमिगत टर्मिनस बांधण्यात येणार आहे. त्यासाठी २१ ऑक्टोबरला निविद काढण्यात येणार आहे.

### काय आहे मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्प?

मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्प ५०८.१७ किमी लांबीचा आहे. या बुलेट ट्रेनमुळे मुंबई ते अहमदाबाद प्रवास अवघ्या काही तसांवर येणार आहे. बुलेट ट्रेन मुंबई, ठाणे, पालघरमार्गे गुजरातच्या वलसाड, नवसारी, सूरत, भारूच, वडोदरा, आणंद, खेडा आणि अहमदाबाद अशी धावणार आहे. महाराष्ट्रातील ठाकरे सरकारने भूमी हस्तांतरण प्रक्रियेत विलंब केल्याने आणि कोरोना महामारीमुळे काम थांबल्याने हा प्रकल्प रखडला होता, अशी माहिती केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी मार्च महिन्यात लोकसभेत विचारलेल्या एका प्रश्नादरम्यान दिली होती.

# ढोल ताशांचा गजर, गुलालाची उधळण अन् बाप्पाचा जयघोष

गणेशोत्सव अवघ्या दोन दिवसांवर आला आहे. या निमित्ताने सध्या सर्वत्र गणेशोत्सवाची लगबग सुरु झाली आहे. गणेशोत्सव अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. प्रत्येक जण आपल्या लाडक्या बाप्पाच्या आगमनासाठी आतुर झाले आहेत. करोनानंतर दोन वर्षांनी गणपती बाप्पाचे थाटामाटात जल्लोषात आगमन होताना पाहायला मिळत आहे. त्यामुळे यंदा सर्वत्रच बाप्पाची आरास, प्रसाद, डेकोरेशन आणि सर्व तयारी जय्यत करताना दिसत आहे. सध्या सर्वसामान्यांपासून सेलिब्रेटींपर्यंत सर्वत्र





लगबग सुरु झाली आहे. या निमित्ताने नुकतंच प्रसिद्ध आणि लोकप्रिय गायक आदर्श शिंदे यांचे गाणे रिलीज झाले आहे.

श्रीगणेशा देवा श्रीगणेशा... असे या गाण्याचे बोल आहे. या गाण्यात ढोल ताशांचा गजर ... गुलालाची उधळण.. बाप्पाचा जयघोष... असे गणेशोत्सवातील भारावून जाणारे वातावरण पाहायला मिळत आहे. तसेच बाप्पाविषयीची भाविकांची आत्मियता या भावपूर्ण गाण्यातून व्यक्त होत आहे. 'अल्ट्रा मीडिया ॲण्ड एन्टरटेन्मेंट प्रा. लि. या गाण्याची प्रस्तुती केली आहे.

## अभिनेता कार्तिक आर्यनने सोडले कोट्यवधी रुपयांवर पाणी

बॉलिवूड अभिनेता कार्तिक आर्यन याने 'प्यार का पंचनामा', 'लुकाछुपी', 'पती पत्नी और वो', 'भूल भुलैय्या 2' अशा चित्रपटांमधून स्वतःला सिद्ध केल आहे. त्याचप्रमाणे तो अनेक मोठाल्या ब्रॅण्ड्सच्या जाहिरातींमध्येही आपल्याला दिसतो. तो बॉलिवूडमधील एक आघाडीचा अभिनेता म्हणून ओळखला जातो. त्यामुळे चित्रपट आणि जाहिरातींमध्ये त्याला घेण्यासाठी अनेक निर्माते उत्सुक असतात. पण नुकतीच एक पान मसाल्याची जाहिरात नाकारली आहे. या पान मसाल्याच्या जाहिरातीसाठी त्याला कोट्यवधी रुपये ऑफर करण्यात आले होते. मात्र, तरीही त्याने या जाहिरातीला नाकार देत या मोठ्या ऑफरवर पाणी सोडलं आहे. काही दिवसांपूर्वीच पान मसाल्याची जाहिरात केल्यामुळे अक्षय कुमार ट्रोल झाला होता. तेव्हापासून अनेक कलाकारांनी पान मसाल्याची जाहिरात करण्यास नकार दिल्याचं समोर येत आहे. काही महिन्यांपूर्वीच अक्षय कुमार पान मसाल्याची जाहिरात केल्यामुळे ट्रोल झाला होता. ते प्रकरण ताजे असतानाच केजीएफ फेम दक्षिणात्य सुपरस्टार यशलाही एक पान मसाल्याची जाहिरात ऑफर झाली होती आणि त्याने ती नाकारली. त्याच्यानंतर आता कार्तिक आर्यननेदेखील कोट्यावधींच्या ऑफरला नाकार दिला आहे. या जाहिरातीसाठी त्याला तब्बल ९ कोटी रुपये देण्यात येणार होते. मात्र, त्याने ही ऑफर नाकारली आहे. त्याने घेतलेल्या या निर्णयामुळे सध्या नेटकऱ्यामध्ये त्याची चर्चा रंगली आहे. आतापर्यंत अजय देवगण, शाहरुख खान, अक्षय कुमार अशा अनेक सुप्रसिद्ध अभिनेत्यांनी पान मसाल्याची जाहिरात केली. या सगळ्यांना नेटकऱ्यांच्या टीकेला सामोरं जावं लागलं. अलिकडेच अभिनेता अक्षय कुमारने पान मसाल्याची जाहिरात केल्याने त्याला मोठ्या प्रमाणात ट्रोल केलं होतं. नेटकऱ्यांच्या या टीकेमुळे त्याने अखेर जाहीरपणे प्रेक्षकांची माफी मागितली होती. परंतु आता कार्तिक आर्यनने ही पान मसाल्याची जाहिरात नाकारल्याने त्याचे कौतुक होत आहे. तसेच त्याने तरुण



## "स्टुडंट ऑफ द इयर मधून पदार्पण केलं असतं पण..." कॉफी

करण जोहरचा कॉफी विथ करण हा टॉक शो सध्या चांगलाच गाजतो आहे. वेगवेगळे बॉलिवूड सेलिब्रिटी यांनी या शोमध्ये हजेरी लावली आहे. कित्येकांनी त्यांच्या किंवा इतरांच्या आयुष्यातली गुपितंदेखील उघड केली आहेत. सारा अली खान, जान्हवी कपूर, समांथापासून सिद्धार्थ मल्होत्रा, विकी कौशल अशा बड्याबड्या स्टार्सनी या सीझनमध्ये हजेरी लावली होती. कॉफी विथ करणच्या ७ व्या सीझनचा टीझर नुकताच प्रदर्शित झाला आहे. या नव्या भागात अभिनेत्री क्रिती सेनॉन आणि अभिनेता टायगर श्रॉफ आपल्याला बघायला मिळणार आहे. या टीझरमध्ये या दोघांनी भरपूर मनमोकळ्या गप्पा मारल्या आहेत त्यामुळे हा पूर्ण भाग बघण्यासाठी चाहते फारच उत्सुक आहेत. या भागात क्रिती ने एका वेगळ्याच गोष्टीचा खुलासा केला आहे. क्रीती म्हणते की, "मी सर्वात कुठली पहिली ऑडिशन दिली असेल तर ती 'स्टुडंट ऑफ द इयर'साठी." पुढे क्रिती म्हणते की, "या चित्रपटाच्या मुख्य भूमिकेसाठी मी ऑडिशन दिली होती. तेव्हा मला बहारा या गाण्यावर नाच करण्यास सांगितलं होतं, शिवाय 'वेक अप सिड' चित्रपटातले काही सीन्सदेखील दिले होते. पण यापैकी मी काहीच धड करत नव्हते. आणि यामुळेच माझं त्या चित्रपटासाठी सिलेक्शन झालं नाही. अर्थात ती भूमिका आलियाकडे गेली म्हणून मी तिच्या बाबतीत आकस बाळगणार नाही."






## गश्मीर महाजनीच्या 'बाथटब फोटोशूट'ची सोशल मीडियावर चर्चा

मराठी चित्रपट सृष्टीमधील हँडसम हंक अशी ओळख असलेला अभिनेता गश्मीर महाजनीचा डान्स आणि लुकचे अनेक चाहते आहेत. गश्मीर महाजनी उत्तम डान्सर आहे. लवकरच अभिनेता गश्मीर महाजनी एका हिंदी डान्स रिॲलिटी शो मध्ये परीक्षकाच्या भूमिकेत दिसणार आहे. गश्मीर महाजनीला डान्स शो मध्ये परीक्षकाच्या भूमिकेत पाहताना त्याच्या चाहत्यांना आनंद होत आहे.

## "एक बॉटल दोन ग्लास..." ऋता दुर्गुळेचा भन्नाट उखाणा ऐकलात का?

नुकतीच हृता दुर्गुळेने झी मराठीवरील 'बस बाई बस' या कार्यक्रमात हजेरी लावली होती. छोट्या पडद्यावरील 'फुलपाखरु' या मालिकेतून घराघरात पोहोचलेली अभिनेत्री म्हणून ऋता दुर्गुळेला ओळखलं जाते. हताने 'फुलपाखरु' या मालिकेतून प्रेक्षकांची मने जिंकली. ती नेहमीच काही ना काही कारणामुळे चर्चेत असते. मराठी सिनेसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्रींपैकी एक अशी तिची ओळख आहे.'अनन्या', 'टाईमपास ३' या दोन्ही चित्रपटांमुळे ती अजूनही प्रसिद्धीझोतात आहे. नुकतीच ऋता दुर्गुळेने झी मराठीवरील 'बस बाई बस' या कार्यक्रमात हजेरी लावली होती. यावेळी ती या मंचावर मंगळगौर खेळली आणि भन्नाट उखाणाही घेतला. झी मराठीवरील 'बस बाई बस' या कार्यक्रमाची सध्या सर्वत्र चर्चा सुरु आहे. या कार्यक्रमात आतापर्यंत अनेक कलाकारासह राजकीय क्षेत्रातील आघाडीच्या महिला नेत्यांनी हजेरी लावली आहे. त्यानंतर अलिकडेच अभिनेत्री ऋता दुगुळेने तिच्या सासूबाई मुग्धा शाह यांच्यासह हजेरी लावली होती.



## शॉर्ट न्यूज »

### स्लो ओव्हर रेट' म्हणजे नेमकं काय?

यूएई । महाईन्यूज

यूएई येथे होत असलेल्या आशिया चषक स्पर्धेतील भारत-पाकिस्तान सामना अनेक अर्थांनी संस्मरणीय ठरला. या सामन्यात भारताने टी-२० विश्वचषक स्पर्धेमधील पराभवाचा वचपा काढला. हार्दिक पंड्याने धडाकेबाज खेळी करून भारताला विजय मिळवून दिला. मात्र या सामन्यात भारत आणि पाकिस्तान या दोन्ही संघांना 'स्लो ओव्हर रेट'मुळे कारवाईला सामोरे जावे लागले. आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने टी-२० सामन्यांतील 'स्लो ओव्हर रेट'वर तोडगा काढण्यासाठी एक नवा नियम लागू केला. या नियमानुसार मैदानावरील ३० यार्ड सर्कलच्या बाहेर पाच ऐवजी चारच खेळाडूंना तैनात करता येते. म्हणजेच षटकांच्या मंद गतीमुळे गोलंदाजी करत असलेल्या संघाला ३० यार्डच्या वर्तुळात जबरदस्तीने एका आगावीच्या खेळाडूला तैनात करावे लागते. भारत-पाक सामन्यात दोन्ही संघांना स्लो ओव्हर रेटमुळे कारवाईला सामोरे जावे लागले. भारताला निर्धारित वेळेत फक्त १८ षटके टाकता आले.

# आशिया चषक : भारताची पाकिस्तानवर पाच गडी राखून मात

## 10 महिन्यांत काढला वचपा

। दुबई । महाईन्यूज ।



आशिया चषक स्पर्धेतील सलामीच्या सामन्यात भारताने पाकिस्तानचा पाच गडी राखून पराभव केला. या सामन्याचे वैशिष्ट्य ठरले ती हार्दिक पंड्याची अष्टपैलू कामगिरी. हा विजय मिळवून भारताने 10 महिन्यांपूर्वीच्या पराभवाची परतफेड केली.भारताने टॉस जिंकून पाकिस्तानला फलंदाजीसाठी पाचारण केले. पाकिस्तानचा डाव 19.5 षटकांत 147 धावांवर आटोपला. पाकिस्तानकडून मोहम्मद रिझवानने सर्वाधिक 43 (42 चेंडू) धावा केल्या. तर, इफ्तिखार अहमदने 22 चेंडूत 28 धावा केल्या. तर भारताच्या भुवनेश्वर कुमारने 26 धावांमध्ये चार गडी बाद केले. तर, हार्दिक पांड्याने 25 धावांमध्ये तीन गड्यांना तंबूत पाठविले. भारतासमोर विजयासाठी 148 धावांचे आव्हान होते. या आव्हानांचे पाठलाग करताना सुरुवातच अडखळतच झाली. डावाच्या दुसऱ्याच चेंडूवर भारताचा सलमावीर लोकेश राहुल बाद झाला. त्यानंतर रोहित शर्मा आणि विराट कोहली ही जोडी मैदानात होती. त्यांचा अनुभव लक्षात घेता मोठ्या खेळीची अपेक्षा होती. पण रोहित शर्माला सुरू गवसत नव्हता. त्याने 18 चेंडूंत 12 धावा केल्या. दुसरीकडे, विराट आक्रमक खेळी करत होता. पण रोहितपाठोपाठ तोही तंबूत परतला. त्याने 34 चेंडूंत 35 धावा केल्या.

त्यानंतर रवींद्र जडेजा आणि हार्दिक पंड्या यांची जोडी जमली. त्यांनी दमदार फलंदाजी करत भारताला विजयाच्या समीप नेले. पण शेवटच्या षटकांतील पहिल्या चेंडूवर जडेजा बाद झाला. त्याने 29 चेंडूत 35 (2 चौकार, 2 षटकार) धावा केल्या. त्यांनी 52 धावांची भागीदारी केली. त्यानंतर शेवटच्या षटकातील चौथ्या चेंडूवर पंड्याने विजयी षटकार लगावला. त्याने चार चौकार आणि एक षटकारासह 33 धावा केल्या.

अष्टपैलू कामगिरी करणारा हार्दिक 'प्लेअर ऑफ दी मॅच' ठरला. आशिया चषक स्पर्धेत भारताने सलग चौथ्यांदा पाकिस्तानला नमवले आहे. 2016मध्ये भारताने पाकिस्तानचा 5 गडी राखून पराभव केला होता. त्यानंतर 2018मध्ये पहिल्या सामन्यात 8 गडी राखून तर, दुसऱ्या सामन्यात 9 गडी राखून पराभूत केले होते. तर, 2021मध्ये झालेल्या टी-20 विश्वचषक स्पर्धेत पाकिस्तानने भारताचा पराभव केला होता. त्याचा वचपा भारताने आजच्या विजयाने काढला. याच मैदानात पाकिस्तानने भारताचा 10 गडी राखून पराभव केला होता.

# आशिया चषकात उद्या अफगाणिस्तान-बांग्लादेश आमने-सामने

## कोणाचे पारडे जड?

। लुसाने। महाईन्यूज ।



आशिया चषकात उद्या 'ब' गटात बांगलादेश विरुद्ध अफगाणिस्तान यांच्यात सामना होणार आहे. भारतीय प्रमाण वेळेनुसार संध्याकाळी ७.३० वाजता शारजहा येथे हा सामना खेळवण्यात येईल.

मोहम्मद नबीच्या नेतृत्वाखालील अफगाणिस्तान संघाने पहिल्या सामन्यात श्रीलंकेला पराभूत केल्यानंतर त्यांचा आत्मविश्वास वाढला आहे. बांग्लादेशला पराभूत करत अफगाणिस्तान सुपर ४ मध्ये आपली जागा पक्की करण्याचा प्रयत्नात असणार आहे. अफगाणिस्तानचा नेट रन रेट सध्या चांगला आहे. त्यामुळे त्यांचा सुपर ४ मध्ये जाण्याचे जवळपास निश्चित आहे. दुसरीकडे बांग्लादेश आशिया चषकात आपला पहिला सामना खेळणार आहे. कर्णधार शकिब अल हसनच्या नेतृत्वाखाली बांगलादेश संघ पहिल्या सामना जिंकून विजयी सलामी देण्याचा प्रयत्न करणार आहे. गेल्या काही दिवसांत बांग्लादेशला पाकिस्तान, वेस्ट-इंडिज आणि झिंम्बाबे बरोबर झालेल्या सिरीजमध्ये हार पत्करावी लागली होती. त्यामुळे हा सामना जिंकण्याचा आणि आशिया चषकात विजयी सलामी देण्याचा ते प्रतत्न करणार आहे. सब्बीर रहमान, मोहम्मद नईम, महमुदुल्लाह, अफिफ हुसैन, शाकिब अल हसन (क), मुशफिकुर रहीम (विकेटकीपर), महेदी हसन, मुस्तफिजुर रहमान, तस्किन अहमद, नसुम अहमद, मोहम्मद सैफुद्दीन.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
96577 67000

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही